## ॥ श्री ॥
## ॥ बाबा ॥

आनंदे नाचू चला। माझा शेगांवीचा राजा आला
सर्वांना,सर्वांना देतो आधार। गणू माझ्या भक्तांचा करीतो उध्दार
गणूने रूप घेतले कृष्णाचे लहान ।
दुरितांचे हेच खरे श्रध्देचे स्थान ।
वांगणीला आला तो पावन झाला ।
बाबा नामांतच तो होतो बेभान ।
त्याचे नामे,त्याचे नामे चाले संसार । गणू माझ्या...॥1॥

मानव सेवेत आहे ईश्वर खरा
तुमच्या मनात जरा वाकून बघा
दु;खात करीता हो धावा त्याचा
सौख्याच्या काळी ही त्याला स्मरा
अज्ञानाचा,अज्ञानाचा जळू दे अंधार ।गणू माझ्या...॥2॥

इच्छा मनाची हा करितो पुरी
मंगलकाळात भेट घे ईश्वरी
विभूतीने व्याधी हा करितो बरी
गंगेची निर्मळता त्याचे उरी
दुःखाचा,दुःखाचा करितो संहार । गणू माझ्या...॥3॥

★★★★★